मध्य रेल

मंडल रेल प्रबंधक का कार्यालय
कार्मिक शाखा, सोलापुर

दिनांक: 04/04/2024

संख्या:SUR/P/Genl/Election-2024

सभी शाखा अधिकारी: सोलापुर मंडल
सभी सम्बंधित: सोलापुर मंडल

विषय : लोकसभा सार्वत्रिक निवडणूक, 2024 च्या अनुषंगाने मतदारांनी मोठ्या प्रमाणात मतदान करावे, याकरिता जाहिराती करण्याबाबत

उपर्युक्त विषय पर नोडल अधिकारी SVEEP लोकसभा निवडणूक, 2024 तथा प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सोलापुर का पत्रांक जा.क्र.०९/स्वीप/लोकसभा निवडणूक/ दिनांक ०२/०४/२०२४ की प्रति सूचनार्थ एवं आवश्यक कार्यार्थ परिपत्रित की जाती है ।

उपरोक्त सूचना सोलापुर मंडल की वेबसाइट: www.cr.indianrailways.gov.inपर अपलोड किया गया है,इस प्रकार से विजिट कर About us> Divisions >Solapur> Personnel > Notification सेक्शन में देखें ।

अनुलग्नक : यथोक्त ।

04/4/2024

कृते मंडल रेल प्रबंधक(कार्मिक)
सोलापुर

प्रति :
**DRM, ADRM:** सोलापुर: कृपया सूचनार्थ ।

ELECTION URGENT
TOP PRIORITY

उत्सव निवडणुकीचा
अभिमान देशाचा
लोकसभा निवडणूक २०२४

# जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा

सिध्देश्वर पेठ, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर.
sveepnodalzpsol@gmail.com

जा.क्र. ०८ /स्वीप / लोकसभा निवडणूक/ दि.०२ /०४ /२०२४

प्रती,
मा. विभागीय रेल्वे व्यवस्थापक
मध्य रेल्वे, सोलापूर डिव्हिजन,
सोलापूर.

विषय :- लोकसभा सार्वत्रिक निवडणूक, 2024 च्या अनुषंगाने मतदारांनी मोठ्या प्रमाणात मतदान करावे, याकरिता जाहिराती करण्याबाबत.

संदर्भ – १) क्र. संकीर्ण २०२४/ प्र.क्र./१५०/२४/३३/ दि. २६ मार्च २०२४
२) मा.अवर सचिव व उप मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचेकडील पत्र क्र. ईएलआर-2017/प्र.क्र.716/17/33 दि. ०४ मार्च, २०२४.

महोदय,

भारत निवडणूक आयोगाने लोकसभा सार्वत्रिक निवडणूक, 2024 घोषित केली आहे. राष्ट्रीय पातळीवरील निवडणूक ही सर्वात महत्वाची व प्राधान्याची बाब असून आपण व आपल्या विभागाने मतदान करण्याबाबतच्या आवाहने व जाहिराती यांना व्यापक प्रसिध्दी देण्याची गरज आहे. सदर निवडणुकीच्या अनुषंगाने मतदारांनी अधिकाधिक प्रमाणात मतदान करावे याकरिता स्वीप कार्यक्रमांतर्गत विविध प्रकारच्या जाहिराती करण्याच्या सूचना मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांनी संदर्भान्वये दिलेले आहेत.

जाहिरातीसाठीचे मराठी मधील प्रचार साहित्य राज्यपातळीवर तयार करण्यात आले आहे. या प्रचार साहित्याचा उपयोग छपाई, डिस्प्ले अथवा आवश्यक त्या माध्यमांमध्ये मोठ्या प्रमाणात करणे आवश्यक आहे. पोस्टर्स तथा अन्य छपाईसाठी शासकीय प्रिंटिंग प्रेसचा वापर करता येईल. प्रसिध्दी साहित्याचे लिंक पुढीलप्रमाणे आहे. https://drive.google.com/drive/folders/1--Swl8trd1WkDzYCEzmN0wO9U061y-eA

वरीलप्रमाणे प्रसिध्दी साहित्यास आपल्या अधिपत्याखाली येणाऱ्या सर्व विभागामध्ये प्रसिध्दी देवून त्याचा अहवाल व कार्यक्रमाचे फोटो यांचा एकत्रितरित्या अहवाल sveepnodalzpsol@gmail.com या ईमेल आयडीवर पाठविण्यात यावे. वरील उपक्रम राबविण्याकरिता समन्वय राहण्यासाठी, अहवाल व फोटो सादर करण्यासाठी आपल्या कार्यालयातील एका कर्मचाऱ्याचे नांव, पदनाम, मोबाईल क्रमांक इ. माहिती sveepnodalzpsol@gmail.com या ईमेलवर पाठविण्यात यावे. ही विनंती.

सोबत – संदर्भीय पत्र

(सुधीर ठोंबरे)
नोडल अधिकारी SVEEP
लोकसभा निवडणूक २०२४
तथा प्रकल्प संचालक
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सोलापूर

"चला मतदान करु या, उज्वल भविष्य घडवू या"

Recd
3/4/2024
17:50

## मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय

क्र.संकीर्ण २०२४/प्र.क्र.१५०/२४/३३,
सामान्य प्रशासन विभाग, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई - ४०००३२,
दि. २६ मार्च, २०२४.

प्रति,

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, सर्व

**विषय :- लोकसभा सार्वत्रिक निवडणूक, २०२४ च्या अनुषंगाने मतदारांनी मोठ्या प्रमाणात मतदान करावे, याकरिता जाहिराती करण्याबाबत.**

महोदय / महोदया,

भारत निवडणूक आयोगाने लोकसभा सार्वत्रिक निवडणूक, २०२४ घोषित केली आहे. राष्ट्रीय पातळीवरील निवडणूक ही सर्वात महत्वाची व प्राधान्याची बाब असून आपण व आपल्या विभागाने मतदान करण्याबाबतच्या आवाहने व जाहिराती यांना व्यापक प्रसिध्दी देण्याची गरज आहे. सदर निवडणुकीच्या अनुषंगाने मतदारांनी अधिकाधिक प्रमाणात मतदान करावे या करिता स्वीप कार्यक्रमांतर्गत विविध प्रकारच्या जाहिराती करावयाच्या आहेत. यानुषंगाने आपण पुढीलप्रमाणे उपक्रम राबविण्यात यावे. जिल्हा निवडणुक अधिकारी या नात्याने मतदान करण्याबाबतचा संदेश अधिकाधिक लोकांपर्यंत आपण पोहोचवणे अपेक्षित आहे.

१. जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय, महामंडळे व सहकारी संस्था इ. कार्यालयात पोस्टर्स, होर्डींग, बॅनर अशा विविध माध्यमांमार्फत प्रचार - प्रसिद्धी करावी.
२. स्थानिक पातळीवर गर्दीच्या ठिकाणी जाहिरात होर्डींग, बॅनर व पोस्टर्स अशा विविध माध्यमांमार्फत प्रचार - प्रसिद्धी करावी.
३. जिल्ह्यातील सर्व नगरपालिका व ग्राम पंचायतीमध्ये मतदानाचे महत्व सांगून मतदान करण्याबाबत आवाहन करण्यात यावे व प्रचार - प्रसिद्धी करण्यात यावी.
४. राज्यातील सर्व महानगरपालिका यांना त्यांच्या बसेस, बस क्यु शेल्टर, होर्डींग व डिजिटल डिस्पले इ. माध्यमामार्फत प्रचार - प्रसिद्धी करण्याबाबत कळविण्यात आले आहे. यानुषंगाने आपल्या जिल्ह्यातील महानगर पालिका यांच्याशी समन्वय साधून सदर प्रचार - प्रसिद्धी करावी. तसेच जिल्ह्यातील इतर स्थानिक स्वराज संस्था यांच्या मालकीच्या असलेल्या बसेस, बस क्यु शेल्टर, होर्डींग, डिजिटल डिस्पले इ. वर जाहीरात प्रसिद्ध करण्यासाठी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था यांच्याशी समन्वय साधून प्रचार- प्रसिद्धी करावी. सदर संस्थांनी स्वत:साठी राखीव ठेवलेल्या ठिकाणी

तसेच आऊटसोर्स केले असल्यास संबंधित संस्थेशी समन्वय साधून ह्या राष्ट्रीय महत्वाच्या उपक्रमाची प्रचार प्रसिद्धी करावी.

५. जिल्ह्यातील रेल्वे, पोस्ट, बँका अशा विविध केंद्रीय कार्यालये व संस्था यांच्याशी समन्वय साधून त्यांच्या कार्यालयातून व विविध माध्यमावर प्रचार - प्रसिद्धी करावी.

६. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसस्थानकांवर, बसेसवर, होर्डींगवर लोकसभा निवडणूकीची प्रचार प्रसिद्धी करण्याबाबत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांना कळविण्यात आले आहे. यानुषंगाने महाराष्ट्र मार्ग परिवहन महामंडळाच्या संबंधित जिल्हा कार्यालयाशी समन्वय साधून सदर प्रचार - प्रसिद्धी करावी. त्यांनी स्वत:च्या जाहिरातीसाठी राखून ठेवलेल्या जागांवर प्रसिद्धी करता येईल.

७. परिवहन आयुक्त कार्यालय यांना व त्यांच्या अधिनस्थ राज्यभरातील कार्यालयांमध्ये विविध होर्डींगवर प्रचार - प्रसिद्धी करण्याबाबत कळविण्यात आले आहे. यानुषंगाने आपल्या जिल्ह्यातील संबंधित कार्यालयात समन्वय साधून सदर प्रचार - प्रसिद्धी करण्यात यावी.

८. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या राज्यातील सर्व होर्डीगवर जाहीरात प्रसिद्ध करण्याबाबत कळविण्यात आले आहे. यानुषंगाने जिल्हातील संबंधित विभागाशी समन्वय साधून सदर प्रचार – प्रसिद्धी करावी.

९. बसस्थानके, चित्रपटगृहे, शहरातील चौक व मोक्याची ठिकाणे इ. गर्दीच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी होईल याची दक्षता घ्यावी.

या जाहिरातींसाठीचे मराठीमधील प्रचार साहीत्य राज्यपातळीवर तयार करण्यात आले आहे. त्या प्रचार साहित्याचा उपयोग छपाई, डिस्पले अथवा आवश्यक त्या माध्यमांमध्ये मोठ्या प्रमाणात करणे आवश्यक आहे. पोस्टर्स तथा अन्य छपाईसाठी शासकीय प्रिंटिग प्रेसचा वापर करता येईल.

प्रचार साहित्याची गुगल लिंक :-

https://drive.google.com/drive/folders/१०Uc५५CdZJYm-६N०६nr७f९kJ९b१Ik१J-F?usp=sharing (गुगल लिंक उघडण्यास अडचण निर्माण झाल्यास श्री. गरुडकर मो.नं. – ९९८७५२४४५६ या क्रमांकावर संपर्क साधावा.)

आपला,

(डॉ. किरण कुलकर्णी)
सह सचिव तथा अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी,
महाराष्ट्र राज्य

सोबत :- प्रचार साहीत्य

प्रत :- उपजिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी, सर्व

# परिशिष्ट

## राष्ट्रीय मतदार दिवस

## मतदारांसाठी प्रतिज्ञा

### मराठी

"आम्ही, भारताचे नागरिक, लोकशाहीवर निष्ठा ठेवून, याव्दारे, प्रतिज्ञा करतो की, आपल्या देशाच्या लोकशाही परपरांचे जतन करू आणि मुक्त नि:पक्षपाती व शांततापूर्ण वातावरणातील निवडणूकांचे पावित्र्य राखू व प्रत्येक निवडणूकीत निर्भयपणे तसेच धर्म, वंश, जात, समाज, भाषा यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करू."

### हिंदी

"हम, भारत के नागरिक, लोकतंत्र मे, अपनी पूर्ण आस्था रखते हुए यह शपथ लेते है की हम अपने देश की लोकतांत्रिक परंपराओंकी मर्यादा को बनाए रखेंगे तथा स्वतंत्र, निष्पक्ष एवं शांतिपूर्ण निर्वाचन की गरिमा को अक्षुण्ण रखते हुए, निर्भीक होकर, धर्म, वर्ग, जाति, समुदाय, भाषा अथ्वा अन्य किसी भी प्रलोभन से प्रभावित हुए बिना निर्वाचनो मे अपने मताधिकार का प्रयोग करेंगे"

### English

"We, the citizens of India, having abiding faith in democracy, hereby pledge to uphold the democratic traditions of our country and the dignity of free, fair and peaceful elections and to vote in every election fearlessly and without being influenced by considerations of religion, race, caste, language or any inducement."